(१९७६) ईवलेसे रोप लावियले दारी, तयाचा वेलु गेला गगनावरी (२००३)



http://www.neomm.org

(ईशान्य ओहायो मराठी मंडळ) ऑगस्ट २०, २००३:गणेशोत्सव विशेषांक: वर्ष २७ अंक ५ TaxID:34-1644989 (Northeast Ohio Marathi Mandal)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

## *मराठी मंडळाचे कार्यक्रम*

*आगामी कार्यक्रम*

**सप्टेंबर ६: गणेशोत्सव**

**नोव्हेंबर ८: दीपावली**

## *कार्यकारिणी २००३*

अध्यक्ष– चेतन अमीन
४४०–९४६–२७१८

उपाध्यक्षा– ज्योती हरवाळकर
४४०–३४७–०६५३

सचिव– आदेश दर्यापूरकर

खजिनदार– समीर देशपांडे

सांस्कृतिक कार्यवाह–
शुभांगी पै
४४०–७३४–१८३०
श्रीकांत लिमये
४४०–७७९–१६३२
अनिता अमीन
४४०–९४६–२७१८

## *ज्योती संपादक मंडळ २००३*

**संपादिका –** अश्विनि दर्यापूरकर
दीपा देशपांडे

## प्रसिद्धिदिनांकाच्या आसपासचे सण,जयंत्या–मयंत्या

ऑगस्ट ३१: गणेश चतुर्थी
सप्टेंबर ९: अनंत चतुर्दशी
सप्टेंबर २६: घटस्थापना
ऑक्टोबर २: गांधी जयंती
ऑक्टोबर ४: दसरा
ऑक्टोबर ९: कोजागिरी पौर्णिमा
ऑक्टोबर २३: धनत्रयोदशी
ऑक्टोबर २४: नरक चतुर्दशी
ऑक्टोबर २५: लक्ष्मीपूजन
ऑक्टोबर २६: पाडवा आणि भाऊबीज

## संपादकीय

मेघांनी दाटलेले आकाश श्रावणसरींनी अवनीला न्हाऊ घालते आणि हिरवा साज लेवून ही वसुंधरा सुशोभित होते. मधूनच येणारी उन्हाची तिरीप तिला सोनेरी मुकूट चढवते. आणि तिचे हे तेजाने विलसित झालेले रुप कवि मनाची प्रतिभा जागृत करते. नागपंचमी, राखीपौर्णिमा, कृष्णजन्माष्टमी अशा अनेक सणांची आणि व्रतवैकल्यांची रेलचेल असणा~या श्रावणाच्या पाउलखुणा सर्वांच्या ह्रदयावर उमटतात आणि मग चाहूल लागते ती भाद्रपदाची. घराघरातून श्रीगणेशाच्या आगमनाची तयारी चालू होते.

प्रत्येक कार्यारंभी ऋद्धिदाता, सिद्धिदाता गणाधीशाचा आशीर्वाद घेतला जातो. आज आम्हीही गणरायाला नमन करुन ज्योतीचा हा गणेशोत्सव विशेषांक वाचकांच्या सुपूर्द करीत आहोत. कळावे लोभ असावा

आपल्या

अश्विनी आणि दीपा

## आली दिवाळी दिवाळी!!!

८ नोव्हेंबर,२००३ रोजी होणा~या दिवाळी कार्यक्रमाच्या वेळेस, मराठी मंडळातर्फे आपल्या सर्वांसाठी रांगोळी, पाककला, आणि आकाशकंदिल बनविण्याच्या स्पर्धांचे आयोजन केले आहे. आपण सर्वांनी सहभाग घेउन स्पर्धांचा आनंद लुटावा ही इच्छा. स्पर्धा विषयक अधिक माहिती आम्ही दिवाळी कार्यक्रमाच्या अगोदर प्रसिद्ध करु. आपले काही प्रश्न असल्यास, कार्यकारिणी पैकी कुणाकडेही संपर्क साधता येईल. दिवाळी कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती आतील पानावर दिली आहे.

तसेच ज्योतीच्या दिवाळी अंकासाठी आपले लेख, कथा, कविता, विनोद इलेक्ट्रॉनिक माध्यमातून आम्हाला president@neomm.org या पत्त्यावर लवकरात लवकर पाठवा.

## ईशान्य ओहायो मराठी मंडळ

# गणेशोत्सव

## ६ सप्टेंबर, २००३



**स्थळ**

**इंडिया कम्युनिटी सेंटर**

**पत्ता: 12412, Cedar Road, Cleveland Heights,**
OH 44106

**कार्यक्रमाची रूपरेषा**

सायंकाळी
४:००– ५:०० पूजा
५:००–५:३० चहा/कॉफी पान
५:३०–७:०० सांस्कृतिक कार्यक्रम
७:३०–९:०० महाप्रसाद
९:००–९:१५ उत्तर पूजा
(पूजा: ठीक ४ वाजता)

**प्रवेश शुल्क:** Fast Access पास धारक आणि त्यांचे पालक वगळता

सभासदांसाठी:
प्रौढ: $५ मुले: $२
इतर आणि पाहुणेमंडळी:
प्रौढ: $८ मुले: $४

**Directions To ICC (Indian Community Center) For Ganapati Program**:

From West Side:
I 90 East, Exit 173B, Turn Right on the Ramp and Go East on Chester Avenue, Right on Stokes Blvd, Left on Cedar Avenue, Left on Cedar Glen Paky, Right on Cedar Rd.

From East Side:
I 271 South, Exit 32 for Brainard Road/ Cedar Rd, Turn Left on the ramp and take a right on Cedar Rd.
There is Starbucks across the street and Firestone , Giant Eagle next to ICC. Parking available behind Giant Eagle, Across Giant Eagle. Curb Side Parking is also permitted

## वदले अध्यक्ष

ज्योतीचा ह्या अंकामध्ये मी प्रथमच मराठीत लिहित असल्याने आपणा सर्वांना आश्चर्य वाटणे साहजिकच आहे. ह्यापूर्वी मला बोलण्याची अथवा लिहिण्याची सवय नव्हती. मराठी मंडळाचा अध्यक्ष झाल्यामुळे मला आता मराठी बोलण्याची आणि लिहीण्याची जरूरी वाटत आहे. लिहीताना काही चुकले तर समजून घ्यावे ही नम्र विनंती.

२ ऑगस्ट ला झालेल्या सहलीचे खेळ उपस्थित लोकांना खूप आवडले. "व्हॉलिबॉल" खेळताना उत्तम टीमवर्कची प्रचिती आली.

ह्या वर्षीची कार्यकारिणी महीन्यातून दोनदा भेटते व आपल्यासाठी कार्यक्रम करण्यास मेहनत घेते. पण मला हा प्रश्न पडला आहे की हे सर्व करून पुढे मंडळाचे भविष्य काय?. आपल्या मंडळाची ५ वर्षांची योजना काय आहे? ५च वर्षात मराठी मंडळाने काय साध्य करावे? सदस्यांनी दर वर्षी एक नवीन कार्यकारिणी निवडायची व त्यांनी कार्यक्रम योजायचे हेच फकत आपले उद्दिष्ट आहे का? आपण मराठी भाषेसाठी व मराठी लोकांसाठी काही नवीन करावे अशी माझी इच्छा आहे. मराठी लोकांना एकत्र आणण्याचा भार फक्त कार्यकारिणी वर नसून आपल्या सर्वांवर आहे.

गणेशोत्सव आणि दिवाळी ह्या पुढल्या दोन्ही कार्यक्रमांना मी आपणांस भेटण्याची आशा बाळगतो आणि आपला निरोप घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र! –
चेतन अमीन, अध्यक्ष 2003

*************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ

## दिवाळी कार्यक्रम

**नोव्हेंबर ८** रोजी आयोजित करण्याचे ठरले आहे.

**स्थळ: Memorial Hall**

**6617, Ridge Road, Parma**
**Directions**: I 480, Ridge Road Exit, Go South On Ridge Road. Left On Westwood Dr. City Hall is at the corner of Ridge and Westwood. Once entered in the premises of city hall, follow directions to the Memorial Hall or Go towards Senior Recreation Center.
Memorial Hall is at the back of City Hall Building

**कार्यक्रमाची रूपरेषा:**
सायंकाळी
४:०० ते ४:३० लक्ष्मीपूजन
४:३० ते ५:०० चहापान
५:०० ते ६:०० जनरल बॉडी मीटींग
६:०० ते ७:०० जेवण

७:०० ते ७:३० स्पर्धा निरीक्षण
७:३० ते ९:३० सांस्कृतिक कार्यक्रम

**प्रवेश शुल्क:** Fast Access पास धारक आणि त्यांचे पालक वगळता सभासदांसाठी
प्रौढ: $८
मुले(५ ते १२ वयोगट): $४
इतर आणि पाहुणेमंडळी
प्रौढ: $१६
मुले(५ ते १२ वयोगट): $८




**ebrate This Festival Seaso**
**with**
**ıthentic Marathi Delicacies**

***Original Marathi Taste***
***Available Year Round***
***Shipped All Over U.S.***
***By FedEx Ground***

For Details, Contact:
**Prashant and Vrinda Gadgil**
**(512)-248-1524**
**prashantgadgil@yahoo.com**

**Bhajani Chakli**
**Chivda**
**Rava Ladoo**
**Besan Ladoo**
**Karanji**
**Gulpoli**
**PuranPoli**
**and more…**

५ वर्षांखालील मुलांना प्रवेशशुल्क नाही.

**RSVP Form**
**Name:**

**Address:**

**# Of Adults:**
**# Of Kids(Ages 5 to 12)**
**# Of Kids( 5 or below)**

**Total # Of Persons Attending The function:**

**नम्र विनंती:** कार्यक्रमास येऊ इच्छिणा~या मंडळींनी अन्न वाया जाणे टाळण्यासाठी व आपल्या मंडळाच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी, **RSVP** चा फॉर्म भरुन पाठविण्याचे सहकार्य करावे ही नम्र विनंती. आपल्या **RSVP** १ नोव्हेंबर पर्यंत आमच्या पर्यंत खालील पत्त्यावर कृपया पाठवाव्यात. ६ सप्टेंबर रोजी होणा~या गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाच्या वेळीही आपल्या **RSVP** स्विकारल्या जातील.

Fast Access पास धारकांनी ई-मेल अथवा फोन वरुन कळवले तरी चालेल.

**NorthEast Ohio Marathi Mandal**
Chetan Amin
1071 Cliffview Drive
Eastlake, OH 44095

**मंडळाचा पहिला स्पर्धा-दिन २००३**
ज्योतीच्या वार्ताहरांकडून
(मिलिंद कंटक)

ज्योतीत छापल्याप्रमाणे आपल्या मंडळाच्या विविध खेळ स्पर्धा-दिनास २ ऑगस्ट रोजी, सुरुवात झाली तेव्हा सकाळचे सव्वा अकरा वाजले होते. ज्योतीचे वार्ताहर मैदानात पोचले तेव्हा टेनिसच्या पहिल्या सामन्यास नुकताच प्रारंभ झाला होता. अजित जोशी व आदेश दर्यापूरकर हे खेळाडू मैदानात उतरले होते. खेळाडूंचे प्रशिक्षक, श्री. काका जोशी आणि कु. आभा दर्यापूरकर, आपापल्या छात्रांना उपदेश देताना दिसले. पंच म्हणून श्रीकांत लिमये यांची नेमणूक झाली. सामना सुरु झाला आणि खेळाडू आपापले कौशल्य दाखवू लागले. मैदानाबाहेर घरंगळत गेलेले चेंडू जमवायला म्हणून प्रेक्षकांपैकीच काहीजणांना निवडण्यात आले. पण चेंडू जमवणाऱ्यांची संख्या एकूण चेंडूंपेक्षा जास्त असल्यामुळे प्रत्येक चेंडूमागे तीन-तीन प्रेक्षक धावू लागले आणि जमवलेले चेंडू खेळाडूंना देण्याऐवजी ते स्वतःच पळवू लागले. त्यावर तोडगा म्हणून पंच लिमयेंनी चेंडू पळवणाऱ्यांनाच पकडण्यासाठी उरलेल्या प्रेक्षकांना निवडले. तेव्हा कुठे खेळाला पुन्हा सुरुवात झाली. भराभर फटके मारून अजित जोशी विजयी ठरले.



पुढचा टेनिस सामना समीर देशपांडे व मिलिंद कंटक यांमध्ये ठरला. पंच म्हणून विजय हरवाळकरांना आणि त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी सरपंच श्रीकांत लिमयेंना निवडण्यात आले. पंच खेळाचे नियम सांगताना खेळाडूंचे लक्ष शेगडीवरच्या मक्याच्या कणसांकडे असल्याचे आढळले. टेनिस रॅकेट कोणत्या बाजूने धरावी यावरून खेळाडूंचा बराच वेळ वाद झाला. शेवटी रॅकेटच्या गोल जाळीपेक्षा



निमुळता दांडा हाताच्या पकडीत चांगला बसतो या निरीक्षणाखाली खेळाडूंनी दांडा हाती पकडण्याचा निर्णय घेतला. टेनिसचे मैदान फार मोठे व त्यामानाने चेंडू फारच लहान असल्याची तक्रार करून खेळाडू मैदानाच्या अर्ध्या भागातच खेळण्याची विनवणी पंचांसमोर करू लागले. पंचांनी त्यांची विनवणी धुडकावून लावली व संपूर्ण मैदान वापरण्याचा हुकूम दिला. नाहीतर सामना रद्द करण्याची घोषणा केली. निराश होऊन दोन्ही खेळाडू अटीतटीचा सामना खेळू लागले. खेळाडूंनी फटकावलेले, सुसाट वेगाने येणारे चेंडू आपल्याला लागून इजा होऊ नये म्हणून पंच हरवाळकर, सरपंच लिमये आणि प्रेक्षकगण संपूर्ण सामन्यात खेळाडूंपेक्षाही अधिक पळापळ करताना दिसले. काही प्रेक्षक तर आकाशातल्या ढगांना पाऊस पाडून खेळ बंद करण्याची आळवणी करतानाही दिसले. पण मंडळाचे हे सळसळते रक्त अतिशय चिकाटीने चेंडूंच्या सान्निध्यात जाण्याचा प्रयत्न करताना दिसले. तासाभराच्या खेळानंतर खेळाडूंपेक्षा पंच व प्रेक्षकांनाच दरदरून घाम फुटल्याची नोंद आहे. सामन्याआधी ठरविल्याप्रमाणे समीर देशपांडेंना विजयी घोषित करण्यात आले.



टेनिसस्पर्धेनंतर दुपार–भोजन स्पर्धेस सुरुवात झाली. या स्पर्धेसाठी पंच व प्रेक्षक म्हणून कोणी काही केल्या तयार होईना. पिठले–भात, तिखट मसालेदार पुऱ्या, शेकवलेली मक्याची कणसे, उपमा, ढोकळा, इडली–सांबार, चटण्या, कापलेल्या कोवळ्या काकडया, इ. खमंग पदार्थांनी स्पर्धा–टेबल भरून गेले होते. भरपूर खादयपदार्थ आणि तितकेच स्पर्धक यामुळे भोजन–स्पर्धा चांगलीच रंगली. "गेल्या सहलीपेक्षा यावेळचे भोजन जास्त खमंग व विविधतेने नटलेले होते" असे समाधान व्यक्त करताना पंचांच्या भूमिकेत बापू गोखले दिसले. भोजन–स्पर्धेत सर्वांना विजयी ठरवण्यात आले.

भोजन–स्पर्धेनंतरसुस्तावलेल्या मंडळींना जागे ठेवण्यासाठी अंताक्षरी–स्पर्धा आयोजित करण्यात आली. आयोजकांनी अंताक्षरी–स्पर्धेचे नियम अमेरिकेच्या कर–विभागासही



(आय.आर.एस.) लाजवतील असे ठेवल्याचे कळले. अंताक्षरीने पेंगुळलेल्या लोकांची दुपारचीच काय पण रात्रीचीही झोप उडवली. तास दीड तासाच्या हिंदी अंताक्षरीनंतर मंडळी अतिउत्साहाने व्हॉलीबॉल खेळायला निघाली. व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी दोन संघ करून प्रत्येक संघात सहा या दराने विभागणी झाली. सामना सुरेख रंगला आणि १५–९ व १५–१३ अशा गुणांनी "संदीप" संघाने "विजय" संघावर मात केली. पिट्सबर्गचे सुप्रसिध्द पंच अशोक गीते यांच्या देखरेखीखाली हा सामना पार पडला. पण एकाच संघाने चेंडूला तीनवेळा हात मारताच पंच गीतेंचे "स्ट्राइक" असे ओरडून तो डाव बाद करून विरुध्द संघाला गुण देण्याचे कारण काही कळेना. सामन्यानंतर वार्ताहरांनी घेतलेल्या मुलाखतीत गीते हे व्हॉलीबॉलचे पंच नसून बेसबॉलचे प्रसिध्द पंच असल्याचे आढळले. मंडळाच्या वडीलधाऱ्या सभासदांचे (बापू गोखले व अनंत हरवाळकर) कौशल्य व चपळता खरोखरच वाखाणण्यासारखी होती. व्हॉलीबॉल सामना वाळूत खेळल्यामुळे नाकातोंडात गेलेले वाळूचे कण काढत काढत खेळाडू तंबूच्या दिशेने जाताना दिसले.



व्हॉलीबॉल सामना संपल्यानंतर मंडळाने "वडा–पाव" कार्यक्रमाची घोषणा केली. बटाटेवडे, पाव, चटण्या बाहेर आल्या. वडा–पावाचा आस्वाद घेत मंडळींनी सहलीची समाप्ती केली.




TAJ PALACE
An Authentic Indian Restaurant
4613 Northfield Road
North Randall, OH 44128
Phone: 216-663-2508
Fax: 216-663-2514

Presenting
Exotic Curries and Tandoori Dishes
Specializing in Indian Catering and Sweets
Open to Catering Orders

Open 7 Days a Week
$5.99 LUNCH BUFFET EVERY DAY
11:30 a.m. – 2:30 p.m.

$7.99 DINNER BUFFET Mon - Wed

http://tajpalace.e2grow.com

Major Credit Cards &
Checks Are Accepted.

**श्रीकृष्ण चरित्र, दोन प्रश्न**
**– श्रीकांत लिमये**

यंदा श्रीकृष्णाष्टमी २० ऑगस्टला येते आहे. खरं म्हणजे, श्रीकृष्णाष्टमीला २० ऑगस्ट तारीख येते आहे. त्या निमित्त गोपाळकाल्या बरोबर हे थोडंसं विचारांनाही खाद्य.

राम आणि कृष्ण ही आपणा भारतीयांची अत्यंत आवडती दैवतं. भारतीय संस्कृतीचं सार जणु काही राम आणि कृष्णाच्या चरित्रांत सामावलेलं आहे. राम आणि कृष्णाची आपल्या वर इतकी मोहिनी आहे की एखाद्याचा देवावर विश्वास नसेल पण त्याला किंवा तिला, राम आणि कृष्ण ही व्यक्तिमत्वं आवडत नाहीत असं सहसा होणार नाही. अगदी बालपणा पासूनच आपल्याला जणू राम–कृष्ण चरित्राचं बाळकडू मिळालं आहे. त्यांतही श्रीकृष्ण आपल्याला आणखीनच जवळचा वाटतो. राम आवडतोच, पण रामा बल आपल्या मनात आदरयुक्त प्रेम जास्ती असतं. कृष्ण कसा आपल्याला एखाद्या मित्र–मैत्रिणी सारखा जवळचा वाटतो. आपल्या पैकी बहुतेकां प्रमाणेच लहानपणी मला ही राम जास्त आवडायचा.. हळूहळू जसं अधिक ऐकत आणि वाचत गेलो, तसा कृष्ण अधिक आवडू लागला. त्या आवडण्यामधे कृष्णा विषयीचं प्रेम तर आहेच, त्याच्या बाललीलांचं कौतुक आहे, त्याच्या कर्तृत्वा विषयीचा आदर आहे, त्याच्या चमत्कारां बल अचंबा आहे, त्याच्या (कृष्ण) नीतिचं कुतुहल आहे, त्याच्या तत्त्वज्ञाना पुढचा खुजेपणाही आहे. या आपल्या अतिशय आवडत्या व्यक्तिमत्वाची जीवनकथा न्याहाळताना जे प्रश्न मला पडतात, त्यातले दोन प्रश्न पुढे दिले आहेत. शक्यता अशी आहे की एखादे वेळीस आपल्या पैकी कुणाला हे प्रश्न पडले असतील आणि कदाचित आपल्या पैकीच एखाद्याला त्यांची उत्तरं सुद्धा सापडली असतील. ह्या प्रश्नांचा विचार करताना आणि त्यांचं समाधानकारक उत्तर मिळवताना, आपण सर्वसाधारणपणे ज्याला अध्यात्म म्हणतो त्याचा फारसा संबंध नाही आणि त्यामुळे त्याची फारशी आवश्यकता नाही असं मला वाटतं. प्रश्न छोटे आहेत. आपल्याला माहिती असलेल्या गोष्टीं बल आहेत.

**द्रौपदी स्वयंवर:**

"मी सूतपुत्राला वरणार नाही!". महाभारतातल्या अनेक नाट्यमय वाक्यांपैकी हे एक वाक्य. बहुधा सर्वात जास्त प्रक्षोभक आणि ज्यामुळे भारतीय युद्ध निर्ति झालं असं म्हणता येईल असे हे द्रौपदीचे उद्गार! प्रसंग सर्वांना माहिती असलेला द्रौपदी स्वयंवराचा आहे. देशोदेशीचे राजे आणि युवराज या स्वयंवराला उपस्थित आहेत. द्रौपदी अतिशय सुंदर आहे. द्रुपदाने वर


Quick & Pick Wireless
verizon wireless
Great Deals on Phones for New / Existing Verizon Customers
(Offer on still stock lasts)



Motorola 120e Only $ 25 plus Free Accessories
Nokia 3285 Only $ 25 plus Free Accessories
Sony Ericsson T61c Only $ 15 ($ 30 mail-in rebate)
Kyocera 2035 Only $ 15 plus Free car charger

Pricing applicable only with a new two year customer agreement on select calling plans.
Phone availability and pricing may vary. While supplies last. Requires credit approval.

Monthly Plans that give Great Values For The Whole Family

Sign up for any America's Choice or Local DigitalChoice Calling Plan starting at $ 39.99 monthly access and get:
* UNLIMITED night and weekend minutes
* + 1000 mobile to mobile minutes
* + 400 or more anytime minutes
* Long distance included from your home airtime rate area




From $ 24.99/month for America's Top 50 to $ 74.99 for America's Everything Pak with 150 channels plus every premium movie channel DISH Network has the channels that you want at a price that's right for you!

For more information:
Call :1-866-268-6060
(513)-671-TALK(8255)
OR Email :
quicknpick@hotmail.com

Saree Mahal
Indian Grocery Store
We Open 7 Days Mon-Sat 10-9 Sun 10-8
We Have All Kind Indian Grocery, Fresh Vegetables, Fresh Sweets and Punjabi-Suits
20940 Southgate Park Blvd.
Maple Hts., OH 44137
You Can Contact
Balwinder Singh or Parminder Kaur
PHONE 216-581-9414 • 216-581-0558 FAX

Mahak-E-Punjab
Fine Indian Restaurant
Dine-In, Take Out, Buffet Catering
We Open 7 Days
Mon-Sat 11-10 Sun 11-9
Balwinder Singh
Parminder Kaur
20940 Southgate Park Blvd.
Maple Hts., OH 44137
216-581-9414 • 216-581-5039

निवडण्यासाठी असा काही कठीण पण लावला आहे, की जो धनुर्विद्या निपुण तरुणालाच जिंकता येईल. द्रौपदीच्या प्राप्तीच्या आशेने आलेले अनेक राजे हा पण पूर्ण करू शकलेले नाहीत. अशा वेळी, कर्णाने माशाचा डोळा फोडण्या करतां धनुष्य उचलल्या नंतर द्रौपदी म्हणते, "मी सूतपुत्राला वरणार नाही!". कर्ण स्वत: रूपवान आहे. बहुधा सूर्या सारखा तेजस्वी आहे. अन्य अनेक गुणां शिवाय धनुर्विद्येतही तो कदाचित प्रथम क्रमांकाचा आहे. पहा ना, तो आतां पण जिंकणार या भयानेच द्रौपदीने वरील उद्गार काढले आहेत.

इथे कर्णाचं उदात्तीकरण करण्याचा माझा हेतु नाही (ते काम आपल्या आवडत्या कादंबरीकारांनी आणि नाटककारांनी या पूर्वीच केलेलं आहे!). कर्णाच्या एकमेव अद्वितीय असलेल्या दानशूरपणा सारख्या गुणां प्रमाणेच त्याच्या अंगी काही अवगुणही होते. कर्णाच्या दुर्गुणांचे पाढे महाभारतकारांनी वेळोवेळी वाचलेले आहेत. इथे द्रौपदीचं बरोबर की चूक?, हा ही प्रश्न माझ्या मनात नाही. प्रश्न वेगळाच आहे. त्या स्वयंवराला स्वत: श्रीकृष्ण उपस्थित आहे. आणि तो नुसता बसून आहे. श्रीकृष्णाचं ते मौन मला अस्वस्थ करतं. कर्णाच्या गुणांचा, कुवतीचा आणि कर्तृत्त्वाचा, केवळ त्याच्या जन्मा वरून केलेल्या अपमानाकडे आणि त्याही पेक्षा, केवळ जन्मा वरून तो पात्र किंवा अपात्र ठरविला जाण्याकडे श्रीकृष्णानं कसं काय दुर्लक्ष केलं ? का बरं कृष्ण काही बोलला नाही? कृष्ण काहीच कसं बोलला नाही?

मुळातच वर्ण आणि जाती व्यवस्था योग्य नाही किंवा निदान जन्मा वरून ती ठरवून त्या वरून भेद करणं बरोबर नाही असं गांधी, हेडगेवार, सावरकर, डांगे, साने गुरूजी, माटे, परांजपे या आणि इतरही अनेक समाज धुरीणांनी आणि विचारवंतांनी सांगितलेलं आहे. केवळ भारतातल्याच नाही तर अन्यान्य देशांतल्या नेत्यांनी अशीच शिकवण वेळोवेळी दिलेली आहे. भारतातल्या एकजात सर्व संतांनी, ज्यांची आपल्या महाराष्ट्रात अभिनामास्पद परंपरा आहे, एकमुखाने हेच सांगितलेलं आहे. आणि काय आर्श्चय पहा, या सर्व संतांना श्रीकृष्णानी सांगितलेली गीता शिरोधार्य आहे ! मुख्य म्हणजे स्वत: श्रीकृष्णाने चातुर्वर्ण्याच्या निर्मिती बल, गीतेमधे "गुणकर्म विभागश:" अशी ग्वाही दिलेली आहे. त्याचं उर्वरित चरित्र सुद्धा हेच सांगतं. तो स्वत: गवळ्याचा पोर म्हणून मोठेपणीही हिणवला गेलेला आहे. असं असताना, प्रश्न असा पडतो की तो गप्प का राहिला? श्रीकृष्णाच्या सामर्थ्याची समकालीनांना पुरेशी कल्पना आहे. त्याला आव्हान देणारं त्यावेळी


# P*R*I*D* E

**Healthcare Benefits Agency**

Quality health insurance at a competitive cost
We work for you not the insurance companies!
We research all insurance companies plans for our clients

*Individual and family plans
*Small and large group health plans
*Medicare and long term care plans

We have clients with over 20 different health insurance companies, below is a list of a few health insurance companies P.R.I.D.E research:

| | | |
|---|---|---|
| Kaiser | Anthem/BC/B S | Aetna |
| Medical Mutual | Golden Rule | Cigna |
| Celtic | United Healthcare | Great West |
| Nationwide | Summacare | John Alden |
| Humana/Employers Health | Qual Choice | Fortis |

We work for you at P.R.I.D.E., so we care about our clients and look out for there best interest. That's why we had a 100% retention rate in 2002and over 97% in the past 6 years with group clients.

For any questions please contact our office at

**(216) 732-8600 / (216) 355-1524**

for free research and consultation & and the lowest cost healthcare plans possible!
Please contact Jimmy.

कोणीही नाही. त्यानं मनात आणलंन तर काहीही घडवण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. तरीही तो काहीही बोललेला नाही?

त्यानं काय विचार केला, किंवा केला नाही? काय तो सभाशास्त्राचे संकेत पाळत होता? त्याच्या आवडत्या द्रौपदीची बाजू न बोलून घेत होता? की भरल्या मंडपात त्याला तमाशा नको होता? की वर्ण-जाती वरून केल्या गेलेल्या भेदा पेक्षा, स्त्रीचा स्वतःचा जोडीदार निवडण्याचा अधिकार त्याला अधिक महत्त्वाचा वाटला होता? की आणखीन काही? तुम्हाला काय वाटतं?

**ही राधा कोण?:**

हा प्रश्न पहिल्या प्रश्ना पेक्षा कमी गंभीर आहे. पण म्हणून तो सोपा आहे असं नाही. राधा-कृष्णाची जोडी कुणाला माहिती नाही ? राधा-कृष्णाच्या मधुर प्रेमाची मोहिनी आपल्यावर इतकी आहे की जागोजागी राधा-कृष्णाची मंदिरं आहेत. तितकी रुक्मिणी-श्रीकृष्णाची ही नसतील. खरं सांगा, राधा-कृष्ण असा घोष आपण नेहेमी ऐकतो आणि करतो, पण किती वेळा आपण रुक्मिणी-कृष्ण असं नाव घेतो? राधा-कृष्णाच्या दैवी प्रेमाने ओथंबलेल्या साहित्यानी बाडंच्या बाडं भरलेली आहेत.

का बरं राधा श्रीकृष्णावर प्रेम करत होती? तिचं लग्न झालेलं आहे. ती अनयाची पत्नी आहे. काय ती कृष्णाकडे शारीरिक प्रेमाने आकर्षित झाली होती? (तो तर काळा सावळा होता. राधा गोरीपान होती असं म्हणतात). काय अनय बदचलन होता? का तो षंढ होता? की तो तिला नीट नांदवित नसे? का ती खरोखरच श्रीकृष्णाच्या मुरलीच्या मंजूळ सुरावटीनं भारून गेली होती?

महाभारतकार या बाबतीत अबोल आहेत. खरं म्हणजे हे सारे प्रश्न, महाभारतकारांच्या दृष्टीने गैरलागू आहेत. कारण महाभारतात राधाच नाही! महाभारतात राधेचा उल्लेखही नाही. फार कशाला, श्रीमद्भागवतातही राधेचा उल्लेख नाही. त्यामुळे खरा प्रश्न असा आहे, की ही राधा कोण? ही कुठून आली. किंवा खरं तर, ही केव्हा अस्तित्वात आली? ज्यांनी विखुरलेल्या वेदांच संकलन करून आज आपल्याला माहिती असलेल्या चार वेदां मधे त्यांचं वर्गीकरण केलं, त्या वेदव्यासांनाही सुचली नाही किंवा आवश्यक वाटली नाही अशी ही व्यक्तिरेखा कुणाच्या कल्पनेतून जन्मला आली असेल?

मृत्युंजयकार शिवाजी सावंतांनी याचं समाधान वेगळ्याच रीतीने केलं आहे.. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे, राधा या शब्दाची फोड किंवा व्युत्पत्ती संस्कृत धातु "रा" म्हणजे लाभणे, मिळणे आणि "धा" म्हणजे मोक्ष अशी आहे. "महाभारत एक सूडाचा प्रवास" ह्या ग्रंथात महाभारताचं एका निराळ्या दृष्टिकोनातून विवेचन करणाऱ्या दाजी पणशीकरांना एकदा मी हा प्रश्न विचारला होता. तेव्हा ते असं म्हणाले होते की, "राधा ना? राधा (महाभारतात) आहेना". त्यांच्या मते 'तुझं माझ्यावर प्रेम नसलं तरीही माझं तुझ्यावर पराकोटीचं प्रेम आहे' ह्या प्रेमाच्या उत्कट अवस्थेचं प्रतिक म्हणजे राधा.

या प्रश्नाच्या सुरुवातीलाच राधा कृष्णाकडे शारीरिक प्रेमाने आकर्षित झाली होती की काय? असा उपप्रश्न उपस्थित केला आहे. तसं काही नसावं. याचं कारण केवळ आज राधा देवता स्वरूप आहे एवढच नाही. लक्षांत घ्या, कृष्ण राधे प्रमाणेच इतर गोपींना ही आवडत असे. आणि मुख्य म्हणजे श्रीकृष्ण जेव्हा गोकुळ सोडून मथुरेला गेला, तेव्हा तो फक्त सात वर्षांचा होता! त्यामुळे राधा-कृष्णाच्या प्रेमाची जी शृंगारिक वर्णनं केली गेली आहेत आणि आजही केली जातात, त्यांत काही तथ्य नसावं. हे ही विचारात घेतल्यावर तर हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतो. कोण ही राधा? ती कुठून आली? ती केव्हा अस्तित्वात आली? तिचं कृष्णा वरचं प्रेम खरं तर वात्सल्यरूप होतं का? हे काय रहस्य आहे? तुम्हाला काय वाटतं?

इसवी सन २००३ मध्ये ह्या प्रश्नांना काय संदर्भ आहे? हे ज्याचं त्याने स्वतः करता ठरवायचं आहे. हे प्रश्न एकूण श्रीकृष्ण चरित्राच्या भव्यते पुढे किरकोळ आहेत. तथापि, व्यक्तिगत किंवा सामाजिक आयुष्यात जेव्हा जेव्हा जटील समस्या उभ्या राहील्या, तेव्हा तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी, विभिन्न विचारसरणींच्या नेतृत्त्वा कडून, श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा, विशेषतः भगवद्गीतेचा आधार घेण्यात आला असं दिसून येतं. त्यामुळेच तर ज्ञानेश्वरी सारख्या गीते वरच्या वेगवेगळ्या टीका आपल्या पुढे उपलब्ध आहेत. या जीवन चरित्राचा आज विचार करताना उभे राहिलेले हे प्रश्न म्हणूनच तितकेच योग्य आहेत. भारतात तसेच भारता बाहेरही, क्लिव्हलॅण्ड सकट शेकडो गावां मधे, गीतेचे पाठ आणि अभ्यासवर्ग आजही चालू आहेत. श्रीकृष्ण चरित्रामधे अशी काही तरी किमया आहे की आजही सर्व सामान्यां पासून तत्त्वचिंतकां पर्यंत सर्वांनाच त्याची ओढ आहे, आव्हान आहे. मला वाटतं, हे तत्त्वज्ञान आणि जीवन चरित्र चिरकाल मार्गदर्शन करणारं आहे.

वरील प्रश्नां मधून श्रीकृष्णाची, त्याच्या तत्वज्ञानाची, राधेची, तसेच राधा आणि कृष्णाच्या अशारीरि प्रेमाची थट्टा किंवा अवहेलना करण्याचा माझा अजिबात हेतु नाही.. तशी शंका सुद्धा मनात आणू नका. आपणा सर्वां प्रमाणेच मलाही श्रीकृष्णा विषयी आत्यंतिक आदर आणि अतिशय प्रेम आहे. राधा-

कृष्णाच्या अलौकिक प्रेमा विषयी अप्रुप आहे. किंबहुना वरचे प्रश्न यातून उद्धवलेल्या आस्थेतून आणि आर्या मधूनच निर्माण झाले आहेत. तुम्हाला सापडतायत यांची उत्तरं? पहा विचार करून.

# "ऐका हो ऐका! गावात नाटक येतंय!"

ती: म्हटलं, गावात नाटक येतंय!

तो: काय? नाटक? वा, वा, कोणतं?

ती: श्री. **रत्नाकर मतकरींनी** लिहिलेलं आणि सध्या महाराष्ट्राच्या रंगभूमीवर गाजणारं..

# "चार दिवस प्रेमाचे"

तो: अरे वा! आणि कलाकार कोण?

ती: आपल्या गावातलेच हौशी कलाकार.. आणि दिग्दर्शक पराग कानविंदे.

तो: वा, वा, छान! पण नाटकात आहे काय?

ती: नाटक आहे मजेदार, हलकं-फुलकं, कौटुंबिक जिव्हाळ्याचं.

तो: मग तर जायलाच हवं! आहे कधी हे नाटक?

ती: कोजागिरी पौर्णिमेच्या सुमारास म्हणजे **११ ऑक्टोबरला** सादर होणार आहे म्हणे. इतर माहिती लवकरच जाहीर होतेय. तेव्हा जायचं ना आपण. आणि मंडळी, तुम्हीपण यायचं हं!

**NorthEast Ohio Marathi Mandal**
**ईशान्य ओहायो मराठी मंडळ**

(Non Profit Organization)
Chetan Amin
1071 Cliffview Drive
Eastlake, OH 44095